**पंतप्रधानांचा टियांजिन, चीन मधील 25व्या SCO शिखर परिषदेत सहभाग (01 सप्टेंबर 2025)**

01 सप्टेंबर 2025

31 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर 2025 पर्यंत चीनच्या टियांजिन मध्ये आयोजित शांघाय सहकार्य संघटना (SCO) च्या राष्ट्र प्रमुखांच्या परिषदेच्या 25व्या बैठकीत पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सहभाग घेतला. शिखर परिषदेत SCO विकास धोरण, जागतिक प्रशासनातील सुधारणा, दहशतवाद विरोधी, शांतता आणि सुरक्षा, आर्थिक आणि वित्तीय सहकार्य आणि शाश्वत विकासावर फलदायी चर्चा पार पडली.

2. शिखर परिषदेला संबोधित करताना, पंतप्रधानांनी SCO चौकटी अंतर्गत सहकार्याला बळकटी देण्यासाठी भारताच्या दृष्टीकोनावर प्रकाश टाकला. या संदर्भात, त्यांनी नमूद केले की भारत - सुरक्षा, कनेक्टिव्हिटी आणि संधी या तीन स्तंभांअंतर्गत अधिक कार्यवाही करण्यास इच्छुक आहे. शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य ही प्रगती आणि समृद्धीची गुरुकिल्ली आहे यावर भर देऊन त्यांनी सदस्य देशांना दहशतवादाशी लढण्यासाठी कठोर आणि निर्णायक कारवाई करण्याचे आवाहन केले. दहशतवादास वित्तपुरवठा आणि कट्टरपंथीकरणाविरुद्ध समन्वित कारवाईची गरज पंतप्रधानांनी अधोरेखित केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सदस्य देशांच्या भक्कम एकजुटीबद्दल आभार मानून त्यांनी दहशतवादाशी निगडीत दुहेरी मापदंड नसावेत यावर भर दिला आणि सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशांना जबाबदार धरण्याचा आग्रह समूहास केला.

3. विकासाला चालना देण्यासाठी आणि विश्वास निर्माण करण्यासाठी कनेक्टिव्हिटीची भूमिका अधोरेखित करताना, पंतप्रधानांनी नमूद केले की भारताने चाबहार बंदर आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर सारख्या प्रकल्पांना मजबूतपणे पाठिंबा दिला आहे. त्यांनी स्टार्ट-अप्स, नवोपक्रम, युवा सशक्तीकरण आणि सामायिक वारशाच्या क्षेत्रातील संधींविषयी देखील चर्चा केली, ज्यांचा SCO च्या छत्रांतर्गत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. जनतेमधील अधिकाधिक परस्पर संबंध आणि सांस्कृतिक समजूतीला चालना देण्यासाठी पंतप्रधानांनी समूहामध्ये एक सभ्यता संवाद मंच सुरू करण्याचा प्रस्ताव दिला.

4. पंतप्रधानांनी समूहाच्या सुधारणा-अभिमुख अजेंड्याला पाठिंबा दर्शविला. या संदर्भात, संघटित गुन्हेगारी, अंमली पदार्थांची तस्करी आणि सायबर सुरक्षेचा सामना करण्यासाठी केंद्रांच्या स्थापनेचे त्यांनी स्वागत केले. संयुक्त राष्ट्रांसह बहुपक्षीय संस्थांमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी समूहाला समान दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे उपलब्ध असेल [Link].

5. पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचे अगत्यशील आदरातिथ्याबद्दल आभार मानले आणि शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. SCO च्या पुढील अध्यक्षपदाची जबाबदारी

स्वीकारल्याबद्दल त्यांनी किरगिस्तानचे देखील अभिनंदन केले. शिखर परिषदेच्या समारोपाच्या वेळी, SCO सदस्य देशांनी टियांजिन घोषणापत्र स्वीकारले. [Link]

टियांजिन, चीन

01 सप्टेंबर 2025